आधुनिक किसान
किमत १६ रुपये ✿ दर गुरुवारी
वर्ष ३ ✿ अंक १६ ✿ २६ जून ते २ जुलै २०१४



मा. नरेंद्र मोदींना विशेष पत्र

# प्रगत शेतीचे गुजरात मॉडेल

कृषी दिन विशेष



- कृषी महोत्सव
- 'सॉईल हेल्थ कार्ड'
- व्हायब्रंट गुजरात
- ज्योतिग्राम योजना
- जलसंवर्धन
- ठिबक सिंचन
- स्वच्छ ग्राम योजना
- ई-प्रशासन
- कंत्राटी शेती
- बहुपीक पद्धत

विशेष पत्र

# विकास कामात आमचाही सहभाग

मा. पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी,

नमस्कार!

आपण पंतप्रधान झाल्याबद्दल विविध दूरचित्रवाणींवरून भारतीयांनी विजयोत्सव अनुभवला. गुजरातमध्ये आपण केलेल्या विकास कार्याची माहिती सर्वांना आहे. मी प्रत्यक्ष भेटीतून त्याची पाहणी केली आहे. १६ व्या लोकसभेत पंतप्रधान म्हणून जाताना आपण एकहाती दैदीप्यमान यश मिळविले. ते मिळविल्यानंतर आपला नम्र अविर्भाव आणि वर्तन पाहतो आहोत. आपण आपली माता आणि मातृभूमीप्रती जो संवेदनशील व्यवहार संपूर्ण जगाला दाखविला, तो पाहून तुमच्या विषयीचा आदर मनात घट्ट बसला आहे.

दिव्य विजय मिळविल्यानंतर आपण प्रथम मातेचे दर्शन घेतले, त्यानंतर वाराणसीत जाऊन 'गंगा महापूजन' केले. खरे तर त्याचदिवशी आमच्याही भावना स्तब्ध झाल्या होत्या. देशाच्या एखाद्या नेत्याने पवित्र गंगेप्रती एवढा 'मनोभाव' दर्शविण्याची ही पहिलीच ऐतिहासिक वेळ. जन्म देणारी माता, देशाच्या पवित्र आणि संस्कृतीची मातृवाहिनी यांना आपण वंदन केले.

आज संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये प्रवेश करताना आपण तेथील पायरीला नमन केल्याची छायाचित्रे सोशल नेटवर्कवरून कोट्यवधी लोकांपर्यंत पोहोचली. त्यानंतर आपण सभागृहात 'कृपा' शब्दाविषयी बोलताना भारावून गेला. ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी म्हणाले की, 'आज का ये विजय दिन दिखाने की कृपा नरेंद्रभाईने की है।' त्यांचे हे उद्गार आपल्या एकहाती विजयाला सलाम करणारे होते; परंतु आपण भाषण करताना 'कृपा' या शब्दावर स्पष्टिकरण दिले ते संपूर्ण भारतवासीयांच्या डोळ्यांत पाणी आणणारे होते. माझ्या आयुष्यात राजकीय नेत्यांची अनेक भाषणे मी ऐकली; पण आपले भाषण ऐकून पहिल्यांदा माझ्याही डोळ्यात अश्रू आले. या अश्रूंच्या मागे कृत्रिमता नव्हती. हे अश्रू थंड होते. असे म्हणतात, उष्ण अश्रू हे भावनातिरेकातून येतात आणि थंड अश्रू हे आपसूक असतात, आपोआप येतात.

आपण म्हणालात, कोणतीही व्यक्ती मातृभमीवर कृपा करत नाही. मातृभूमी माणसावर



अशोक जैन पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांचेसमवेत.

कृपा करते. माणूस तर देशसेवा करण्यासाठी आहे. आपले प्रत्येक वाक्य आणि शब्द मनाला भिडणारे होते. गेली ५०-६० वर्षे आम्हीही बहुप्रकल्प उद्योग, सामाजिक, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रांत काम करीत आहोत. मात्र, आज आपले शब्द ऐकून मी व्यक्तिशः पूर्णपणे भारावून गेलो. सामान्य माणूस तर निश्चित रडला असेल.

मातृभूमीच्या विकासासाठी आपण मांडत असलेली भूमिका पारदर्शी वाटते. येणाऱ्या पाच वर्षांत निश्चित चांगले दिवस येतील, असा विश्वास वाटतो. आम्हीसुध्दा ऊर्जा, अन्न आणि पाणी या क्षेत्रांत शाश्वत विकासासाठी प्रयत्न करीत आहोत. आपल्याकडे संशोधन आहे, निर्मिती क्षमता आहे, लोकांपर्यंत पोहोचण्याचे नेटवर्क आहे. देशाच्या सुनिश्चित व दिशादर्शक विकासात आपणास योग्य ते पारदर्शी सहकार्य करण्याची आमची तयारी आहे.

पाच वर्षांनंतर आपण पंतप्रधान म्हणून केलेल्या कामाचे प्रगती पुस्तक सादर करणार आहात. त्यात निश्चितपणे आमचाही काही तरी सहभाग असेलच, याची मी खात्री देतो. आपल्या पंतप्रधानपदाच्या भावी वाटचालीस खूप खूप शुभेच्छा !

अशोक जैन,
उपाध्यक्ष,
जैन उद्योग समूह

*(टीप - अशोक जैन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना लिहिलेले हे पत्र 'आधुनिक किसान'च्या विशेषांकानिमित्त देत आहोत -संपादक)*